

लतीबाई दांडेकर

IRBK-0106267

IRBK-0106267

दा. क. ६२६७

भिकाजी ढवळे

गिरगांव : मुंबई




# ज्ञान गोष्टी...१

लेखिका

सौ. मालतीबाई दांडेकर

मूल्य चार आणे

IRBK-0106267

पहिली आवृत्ति
१९४१
पुनर्मुद्रण
१९४४
१९४९
१९५७

मुद्रक
श्रीनिकेतन ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

क्रमांक १३६० ... दि. ३१-३-६७

ह्या गोष्टीं लहान बालमित्रांना देतां येत आहेत ह्याचं श्रेय सर्वस्वीं माझ्या [illegible] लहान मुलांनाच द्यायला पाहिजे. त्यांची रोज माझ्यामागें भुणभूण ! आई ! गोष्ट सांग, गोष्ट सांग ! रोज गोष्टी सांगून सांगून ऐकीव गोष्टी संपल्या, वाचलेल्याही संपत आल्या. रचलेल्याही खलास झाल्या. मोहनला तर गोष्ट रोज 'अगदीं नवी अन् सुंदर' हवीच ! एकादे वेळीं पुन्हा तीच गोष्ट सांगूं लागलं तर तो म्हणे, "आई ! ही माहीत आहे बुवा ! ही नको !" शेवटीं त्यांच्यासाठीं इंग्लिश गोष्टी वाचून मराठींतून सांगाव्या लागूं लागल्या. त्या त्यांना फारच आवडल्यासं दिसून आलं. त्यामुळेंच इतर बालगोपालांनाही त्या आवडतील अशी कल्पना आली व तीच छान गोष्टींच्या रूपानें दिसत आहे.

मूळ इंग्लिश कल्पना कायम ठेवून मराठींत मीं त्याचं रूपान्तर केलं आहे. माझ्या बालमित्रांना त्या आवडतील अशी आशा आहे. केशव भिकाजी ढवळे, ह्यांनीं श्रीसमर्थ-सदन—बाल-प्रकाशन-मालेमार्फत हीं पुस्तकें सुंदर स्वरूपांत व छानदार चित्रें घालून प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचेही आभार मानायला हवेतच.

सौ. **मालती दांडेकर**

## अनुक्रमणिका

मेणाची शांता
५
हरवलेले हातरुमाल
९
अस्वल्या शिपाई
१३
सुलीची मामी
१७
डिक् व मांजर
२३
अद्भुत दगड
२७



# मेणाची शांता

बाबू कांहीं मोठासा सुंदर नव्हता. पण तो जेव्हां त्याच्या लाकडी घोड्यासकट पळूं लागतो, तेव्हां रुबाबदार दिसतो असें छबुलीचें मत होतें.

छबुली साखरेची केलेली होती. ती, आणखी मेणाची बनवलेली शांता, दोघीही खेळण्यांच्या कपाटांत वरच्या फळीवर अगदीं शेजारींशेजारीं ठेवलेल्या असत. पण शेजारणी असल्या तरी अगदीं मैत्री असतेच असें कुठें असतें! छबुलीला तर उलट शांताचा मनापासूनच राग यायचा! कारण शांता जराशी गर्विष्ठ होती व आठ आण्यांखालीं किंमत असलेल्या खेळण्यांकडे किंवा बाहुल्यांकडे ती नुसती ढुंकूनसुद्धा पाहायला तयार नसे! प्रत्येक खेळण्यावर किंमतीची चिठ्ठी असे ती पाहून नंतर शांता बोलायची आणि तीही मेहेरबानी करायची लहर लागली तर!

स्वतःची किंमत मात्र साडेतीन रुपये आहे असें ती ज्याला त्याला मोठ्या डौलानें सांगे. 'किंमतीची चिठ्ठी कुठाय्?' असें विचारलें तर मात्र ती म्हणे, "इश्श मेलं! तें चिटोरं पडलं बाई कुठेंतरी!"

बाबूला ती फार आवडे व तिनेंही प्रथम कांहीं दिवस बाबूशीं बोलायची कृपा केली होती. पण बाबूच्या दुर्दैवानें खेळण्यांच्या कपाटांत एक जंगी अपघात झाला. लोकरीचें अस्वल धाडकन् पडलें.

६ त्याचा धक्का लागून कळीची मोटार एकदम चालायलाच लागली व तिनें बाबूला धक्का दिला. बिचाऱ्या बाबूचा घोडा उधळला व त्यानें बाबूला भिरकावून दिलें. तो खालीं डोकें व वर पाय असा पडला! त्याच्या डाव्या तळपायावर 'सहा आणे' असा छाप होता! तो शांतानें पाहिला. झालें! तिनें त्याच्याशीं बोलणें बंद केलें!


दुसरे दिवशीं छबुलीच्या मैत्रिणींना व मित्रांना चहापार्टी होती. तेव्हां शांता बाबूकडे कपाळाला आंठ्या घालून पाहात होती व दुसराच एक ठाबू म्हणून साखरेचा शिपाई होता त्याच्याशीं गोष्टी बोलत होती.

बाबूला तें बिलकुल आवडलें नाहीं. तो खूप चिडला होता. त्यामुळें छबुलीला मात्र फार आनंद झाला. कारण बाबूनें शांताशीं दोस्ती करावी हें तिला मुळींच खपत नसे. तिनें बाबूला आपला नवरा करायचें ठरवून टाकलें होतें व त्यासाठीं शांताबद्दल शक्य तेवढा तिरस्कार त्यानें दाखवलाच पाहिजे असें तिला वाटत होतें. त्यामुळें शांता रागावली ही छबुलीला मोठीच सुसंधि सांपडली. नंतर तिनें साडी बदलली. ही नवी साडी कुमुदच्या (तिची मालकीण) परकरांतल्या एका जुन्या तुकड्याची होती. पण कुणाला तशी कल्पनाही येणार नाहीं इतकी ती छबुलीला शोभत होती.

मग मोठ्या डौलानें बाबूसमोर जाऊन ती म्हणाली, "साहेब, बरी आहे का ही साडी? खुद्द बनारसहून आणली हो!"

बाबूसाहेबांनीं आपले गुंड्यांचे डोळे शून्यपणानें फिरवले! कारण त्यानें पूर्वींच म्हटलें होतें, "शांता खरी राणीसारखी दिसते!"

छबुलीला जेव्हां हें कळलें तेव्हां तर शांताचा ती खूपच द्वेष करायला लागली. एकदां खेळांतल्या लाकडी बाहुलीनें सर्व खेळकंपनींतल्या मंडळींना चहाला बागेंत बोलावलें आणि फळफळावळींचीं जरी ६



৬

लाकडी बशांवर नुसतीं चित्रेंच होतीं तरी पण लहान कपबशांतून चहा मात्र खराच होता!

बागेंत कडक ऊन होतें, हें पाहून छबुलीला एक दुष्ट युक्ति सुचली. तिनें शांताला बोलावलें, अन् म्हटलें, "तुला एक गम्मत सांगायची आहे. तिकडे उन्हांत चल!"

शांता बिचारी जरा एकीकडे उन्हांत येऊन उभी राहिली. छबीनें गम्मत सांगायच्याऐवजीं तिला एक धक्काच दिला! त्याबरोबर शांता पडली. अन् गंमत अशी कीं, तिचे डोळे ती आडवी होतांच मिटले अन् ती झोपीं गेली. कारण तुम्हांला ठाऊक असेलच कीं, पुष्कळ बाहुल्या निजवल्या कीं डोळे मिटून घेतात. कागदाच्या पेटींत असतात अशा बाहुल्या. छबीला तें ठाऊक होतें. ती उन्हांत झोपीं गेली म्हणून छबी परत आली.

एक तासानें सर्वांना ती बागेंत सांपडली. पण कोणत्या स्थितींत! अयाई! काय तिची अवस्था! तिचा सफेत गुलाबी रंग कुठें होता? सगळीकडे मेणाचे घाणेरडे ओघळ आले होते व सुंदर नाक वितळून हनुवटीपर्यंत ओघळलें होतें! किती विचित्र दिसत होती ती!

"काय भयंकर दिसते बाई शांता! तिच्याकडे बघवतसुद्धा नाहीं!" सर्व खेळणीं खुळखुळ करून कुजबुजूं लागलीं. पण बाबू रडव्या आवाजांत म्हणाला, "शांते, अजूनदेखील तूंच मला आवडतेस; तूं मला अशीदेखील सुंदर वाटतेस. तूं माझी किंमत थोडी आहे हें विसरणार असलीस, तर मी जन्मभर तुला सुखांत ठेवायला तयार आहें!"

शांताला बाबूच्या प्रेमळपणाचें इतकें कौतुक नि समाधान वाटलें कीं, लौकरच तें अद्भुत लग्न झालें. पण छबुलीला मात्र एक गोष्ट सारखी टोंचीत असते. कदाचित् ती तिच्या साडीला लावलेली खोट्या खड्यांची पिन्‌ही असेल किंवा तिच्या त्या दुष्ट युक्तीमुळेंच हें लग्न झालें ही आठवणही असेल....!!




छोटी पुष्पा आज अगदीं त्रासलेली दिसत होती. परवांपासून तिनें तीन नवे, सुंदर रेशमी रुमाल हरवले होतेन्. दर वेळेला नवा फ्रॉक नि नवा त्याच रंगाचा चिमुकला रुमाल आई तिला द्यायची. पण परवांपासून तिनें आपले रुमाल कुठें टाकले होतेन् कुणाला ठाऊक!

आई रागानें डोळे मोठे करून म्हणत होती, "काय म्हणतील तुझे काका आतां? नुकतेच त्यांनीं ते सारे रुमाल विकत घेतले होते. मला मोठं नवल वाटतं, तूं हातरुमाल टाकतेस तरी कुठें? कुठें जातात सारे? सांपडतदेखील नाहींत!"

पुष्पेलादेखील तोच प्रश्न पडला. ती मनांत म्हणाली, "खरंच, मलाही नवल वाटतं. ढीगच्या ढीग या हरवलेल्या रुमालांचे सांठले असतील कुठें तरी! आमच्या शाळेंत तर रोज एक तरी मुलगी हातरुमाल हरवतेच!"

रात्रीं ती निजली तेव्हांदेखील 'सारे रुमाल कुठें जातात' हाच विचार करीत होती.

"मी दाखवूं का ते रुमाल कुठें जातात ते?" एक चमत्कारिक आवाज तिच्या कानांत ऐकूं आला.

ती चट्कन् उठून बसली. एक निळा पोषाख केलेला अगदीं लहान माणूस तिच्या उशागती

उभा होता. त्यानें कमरपट्ट्यांत एक छोटासा पितळेचा चिमटा खोंचून ठेवला होता.

"खरंच का तूं मला दाखवणार आहेस हरवलेले हातरुमाल?" ह्या तिच्या प्रश्नाला उत्तर म्हणून निळूनें आपला तो चिमटा तीनदां हलवला. लगेच आपण रस्त्यांतून घाईघाईनें पळत आहों असें पुष्पेला आढळून आलें. खूप वेळ चालत होतीं तीं दोघें. शेवटीं तीं एका वाड्याजवळ आलीं. दारावर एक जंगी पाटी होती—

## हरवलेल्या हातरुमालांचा रुमाली वाडा

निळूनें चिमट्यानें दार उघडलें व पुष्पा एका मोठ्या खोलींत आली. मध्यभागीं एक पांढरा शुभ्र पर्वत होता व त्यावरून निळूसारखे चिमटे घेतलेले हजारों लोक खालींवर धावत होते.

"अय्या! काय तरी मजेदार पांढरा पर्वत!" पुष्पा म्हणाली.

निळू हसला अन् म्हणाला, "वा! पर्वत नव्हे कांहीं तो. तो तुझ्यासारख्या बावळट मुलांमुलींच्या हरवलेल्या हातरुमालांचाच ढीग आहे, पुष्पा!"

"हो का?" पुष्पा विचारूं लागली, "किती वर्षं लागलीं असतील एवढा ढीग जमायला, नाहीं?"

"वर्षं?" निळू मजेनें म्हणाला, "वर्षं कसलीं? ह्या सर्व निळ्या शिपायांनीं फक्त आजच, एकाच दिवसांत साऱ्या शहरांतले हरवलेले इतके हातरुमाल गोळा केलेले आहेत. तुम्ही जे रुमाल हरवतां, ते गोळा करण्याचं काम रोजच आम्हांला करावं लागतं. फार मोठं, कंटाळवाणं काम बुवा!"

"मग, पण इतक्या रुमालांचं करतां तरी काय?" पुष्पेनें विचारलें.


"खरोखर काळजीपूर्वक वागणारीं जीं चांगलीं मुलं असतील त्यांचे रुमाल आम्ही परत त्यांच्या

घरांत नेऊन एखाद्या कोंपऱ्यांत किंवा असेच कुठेंतरी टाकतों. मग पुन्हा त्यांना सांपडतात ते. पण अव्यवस्थित, निष्काळजी, हलगर्जी मुलांचे व मुलींचे रुमाल मात्र इथेंच ठेवून देतों."

"बरं तूं आटप. ह्या ढिगांतून हुडकून काढ लवकर तुझे तिन्ही रुमाल. कारण वाडा लवकरच बंद होईल! पाहा हं!"

नंतर तो त्या पर्वतावर पळत गेला व चिमट्यानें त्यानें सर्व रुमाल खालींवर करण्यास सुरुवात केली.

"तो पाहा! तो पाहा! 'पुष्पा' नांव आहे तो एक! हा दुसराही मिळाला, कोंपऱ्यांत आईनें फुलपांखरूं विणलेला–हा माझाच! अय्या! हा पाहा तिसराही सांपडला! गुलाबी कांठांचा! सारे सांपडले हो!" अन् तिनें निळ्या त्या पर्वतांतून ते तिन्ही रुमाल काढून घेतले.




"ठीक ! जा तूं आतां. रुमाली वाडा बंद करणार आहें मी !"

धावत परत येऊन पुष्पा आपल्या छोट्या गादीवर निजली.

"पुष्पे !" दुसरे दिवशीं आई म्हणाली, "तुझे सारे रुमाल सांपडले हो ! बाहेरच्या खुर्चीवर एक होता, एक आरशामागें पडला होता व तिसरा बघ, तुझ्या खेळांत सांपडला बरं का !"

पुष्पा हसली. ते सारे कसे परत मिळाले तें तिलाच जास्त माहीत होतें आईहून ! !



# अस्वल्या शिपाई

एक होता शिपाई. तो अगदीं दरिद्री होता. जवळ विष खायलादेखील पैसा नव्हता. आतां काय करावें असा विचार करीत तो एका झाडाशीं उभा राहिला. समोरून एक गृहस्थ आला. त्याच्या अंगावर अस्वलाच्या कातड्याचा केसाळ कोट होता. तो म्हणाला, "जानबा, तुला खूप श्रीमंत व्हायचं आहे का?"

"मला तरी दुसरं काय हवं?"

"ठीक. हा कोट घाल तर. याचे खिसे पैशांनीं भरलेले आहेत. अन् ते तूं कितीही घेतलेस तरी ते खिसे रिकामे होणार नाहींत. मी सात वर्षं हा कोट तुला देईन. पण त्याबद्दल तूं कांहीं अटी पाळशील का?"

"सांगा अटी."

"सात वर्षांत आंघोळ करायची नाहीं; दाढी करायची नाहीं; नखं काढायचीं नाहींत; दांत

घासायचे नाहींत; डोक्याचे केस कापायचे नाहींत किंवा विंचरायचेही नाहींत; अन् हे कपडे बदलायचे नाहींत! बस्स! कबूल?"

जानबानें क्षणभर विचार करून तें कबूल केलें. कारण भुकेनें तरी मरायचेंच ना? त्यानें विचारलें, "कोण आहेस तूं?"

"सैतान. आम्हांला घाणेरडेपणा आवडतो बाबा!" हसून सैतान निघून गेला.

पहिल्या वर्षींच जानबानें एक सुंदर घर बांधलें; शेतें, बागा, मळे घेतले. पैसे काय? वाटेल तितके! काढायचे नुसते खिशांतून; इतकेंच! गरिबांच्या झोपड्यांतून तो मुठी भरभरून पैसे देई. सर्व गरिबांना तो खूप आवडूं लागला.

हळूहळू त्याची दाढी खूपच वाढली. डोक्याचे केस मानेवर पडूं लागले. मिशा गालांवरून खालीं उतरल्या. नखें लांबच लांब झालीं. कपडे कळकट झाले. लोकांना त्याची किळस येऊं लागली. पण काय करायचें? अटीच होत्या ना तशा?

ते वाढलेले कळकट केस, तो घामटपणा, तीं नखें अन् तो अस्वलाच्या कातड्याचा कोट! ह्यामुळें तो सुंदर शिपाई थेट अस्वलासारखा दिसूं लागला. लोक त्याला अस्वलसिंग म्हणूं लागले.

दुसऱ्या एका गांवीं तो जत्रेला गेला. गरीब-गुरिबांना, भिकाऱ्यांना त्यानें हजारों रुपये वांटून टाकले. परत यायला रात्र झाली म्हणून तो एका खाणावळींत गेला.

खाणावळवाला नाक वाकडें करून म्हणाला, "इथें येऊं नका बुवा! पंगत जेवायला बसलेली उठून जाईल तुम्हांला पाहून!"

"मी जरा गोठ्यांतच पडतों इथें. कृपा करा; माझे पाय दुखताहेत. इथेंच निजतों मी गोठ्यांत गवतावर! मी आंत येतच नाहीं." असें म्हणून तो

तिथेंच निजला. लवकरच तो जागा झाला. इतक्यांत त्याला एका गृहस्थाचें विव्हळणें ऐकूं आलें. विहिरीच्या कांठावर एक म्हातारा जीव देण्यासाठीं बसला आहे अन् उडी टाकणार आहे, असें दिसलें!

जानबानें त्याला खालीं उतरलें. त्याला पाहून तो आधीं भीतीनें थरथरूंच लागला. पण जानबा म्हणाला, "काय झालं बाबा? मला सांग. भिऊं नको. मी माणूसच आहें. अस्वल नाहीं."

"कर्ज पांच हजार झालं आहे. उद्यां घरादाराचा लिलांव होणार आहे. तेव्हां जगून तरी काय करायचं म्हणून जीव देणार होतों."

"हे घे पांच हजार रुपये!" खिशांतून पैसे काढीत जानबा म्हणाला, "अन् बाबा, आतां जाऊन स्वस्थ झोंप हं!"

"तुम्ही कोण देवदूत तर नाहीं ना? चला आमच्या घरीं. मला तीन सुंदर मुली आहेत. त्यांतली एक मी तुम्हांला देतों."

अस्वल्या त्या माणसाच्या घरीं आनंदानें गेला. वडील दोघी मुली एकदम ओरडल्या, "अगबाई! हें कोण मेलं भूत आलंय्!"

पण धाकटी जमना म्हणाली, "बाबा, बाबा...! तुमच्या वचनासाठीं मी यांच्याबरोबर लग्न करीन!"

जानबाला फार हर्ष झाला. त्यानें आपली रत्नाची आंगठी मध्यें कापली व तिला दिली. उरलेली आपल्याजवळ ठेवून तो म्हणाला, "आणखी तीन वर्षं मला लग्न करतां येत नाहीं; मग येईन मी. ही खूण तेव्हां दाखवीन!" असें म्हणून तो निघून गेला.


जमना बिचारी! साधीं पांढरीं पातळें नेसे. घरांतलें सारें काम करी. वडील दोघी बहिणी म्हणायच्या, "जमने, त्या अस्वलाची घाण कशी ग आली नाहीं तुला? जमना, लग्नांत हें अस्वल नाच

१६करील, नाहीं ग ! सांभाळ हो ! अस्वलं गुदगुल्या करून जीवही घेतात बरं का ! ” ती नुसतें ऐके, डोळ्यांतून पाणी गाळी अन् मुकाट्यानें तेथून चालती होई !

सात वर्षें संपत आलीं. जानबा साऱ्या गांवांतल्या गरीबगुरिबांना आवडे. त्यानें किती गरीब कुटुंबें वांचवलीं होतीं. स्वतःच्याही घरांत त्यानें पुष्कळ संपत्ति सांचवून ठेवली होती.

सात वर्षें संपलीं एकदांचीं ! झटपट झाडाजवळ गेला. सैतानानें कोट परत घेतला आणि त्याला शाबासकी दिली. सैतान म्हणाला, “ इतके पैसे असूनही तूं वाईट वागला नाहींस. माझ्या तडाक्यांतून सुटलास हं ! शाबास जानबा ! ”

घरीं येऊन जानबानें आधीं केस कापले व मिशा न् दाढी कापून काढली. नखें जवळजवळ वीतवीत लांब झालीं होतीं तींही काढलीं. साबणाच्या कितीतरी



वड्या नासून शेंभर गरम बादल्या पाणी घेऊन स्वच्छ आंघोळ केली व सुंदर कपडे घालून तो जमनाकडे निघाला. कितीतरी सुंदर दिसत होता तो ! जसा एखादा सरदारच ! त्या दोघी बहिणी त्याच्याशीं गप्पा मारीत खिदळूं लागल्या. जमना बिचारी कळकट पातळ नेसून घर साफ करीत होती. म्हातारा तंबाखू खात होता. त्याला जानबा म्हणाला, “ मी तुमचा जांवई होणार आहें हं !”

दोघीहीं लाजल्या. एक तर हळूच म्हणते, “ कोणाशीं लग्न ? माझ्याशींच ना ! का हिच्याशीं ? ”

जानबानें हसून अर्धी आंगठी दाखवून म्हटलें, “ जमनाशीं ! अस्वलसिंगांना पाहून तुम्हांला तर ओकारी येते ना ? ”

बिचाऱ्या दोघींनीं आत्तां ओळखलें कीं तो तोच म्हणून ! रडवे चेहेरे करून त्या आंत चालत्या झाल्या !

“ जमना, मी अस्वलसिंग आलों आहें ! ही बघ खूण. आंगठी ! ”

जमनानें काम करतांना वर पाहिलें व तीन वर्षांत ती आत्तांच गोडसें हसली !

लवकरच त्यांचें लग्न थाटांत झालें ! आतां नुसतें जानबा-जमना नाहीं हं म्हणायचें ! श्रीमंत जानकोजीराव राजे अन् श्रीमंत सौभाग्यवती राजराजेश्वरी जमनाबाईसाहेब ! समजलें ना ?



# सुलीची मामी



सुलीला कुऽणी नव्हतें! आत्या नाहीं, मामी नाहीं, मावशी नाहीं, काकू नाहीं, कोऽणी नाहीं. तिच्या माहितींतल्या साऱ्या मुलांना न् मुलींना मावश्या होत्या, आत्या होत्या. एकेक तर खात्रीनें होतीच. इंदूला तर पांच आत्या होत्या. एखादी वाईट मामी असती तरीदेखील हव्या तशा थापा द्यायला आल्या असत्या. पण...कोणीच नाहीं! किती अपमानास्पद स्थिति ही!

दिवाळीच्या वेळीं तर सुलीला हा अपमान फारच जाणवत असे. कारण सगळ्यांच्या आत्या भाऊबीजेला यायच्या! मावश्या बहिणींना भेटायला येत. अशाच साऱ्या तेव्हां जमत असत. अन् प्रत्येक मुलगी त्याबद्दल बोलण्यांतच दंग आपली...!. माझ्या मामीनें असें केलें...माझ्या काकूनें मला फ्रॉक आणला! माझ्या मावशीनें मला पुण्याहून सुंदर बाहुल्या आणल्या...माझ्या आत्यानें फटाके आणले येतांना....! एक न् दोन! अन् ह्या साऱ्या गर्विष्ठ गोष्टी बिचारी सुली आंबट तोंड करून ऐकून घेई व घरीं आल्यावर उशींत तोंड खुपसून निजे. सांगायचें तरी कुणाला! आई फराळाचें करण्यांत नि छोट्या बाळांतच दंग. बाबांची कचेरी. आत्या असती तर सारें कांहीं तिच्या कुशींत निजून सांगितलें असतें! पण कोणीच नाहीं! येऊन जाऊन बापूमामा तेवढा आहे. पण त्याला काय कळतें? आपण कांहीं सांगायला गेलें तर म्हणतो,

"ए हे रे ऽ! वेडी आहेस सुले तूं!" काय त्याचा उपयोग?

एके दिवशीं तर सुलीला तें दुःख अगदीं असह्य झालें. इंदूचा वाढदिवस होता, म्हणून तिच्या पांची आत्यांनीं खूप गम्मत जम्मत धाडली होती. सुंदर काळे बूट, गुलाबी फ्रॉक, चित्रांचें पुस्तक, ओव्हरकोट, काय काय तरी होतें त्या जमतींत! एका आतेनें तर मुंबईहून एक खूप मोठी बाहुली आणली होती. काय तिची मजा! डोळे उघडून हसायची न् मग डोळे मिटायची ती! पुष्कळ मुली जमल्या आणि मग एकेक जण आपापल्या आत्या–काकू–मामी–मावशीचें कौतुक सांगूं लागली.

"आमच्या मावशीकडे तर मोटार आहे." मैना म्हणाली.

"आमच्या मावशीकडे एक ससा नि दोन हरणं आहेत बाई!" तारा म्हणाली.

"आमच्या मामीनं मला शंभर चित्रांचीं कार्डं द्यायचं कबूल केलंय्." आशा म्हणाली.

"आमच्या आत्यानं मला बाहुलीकरतां कपबशा, किटली आणली आहे. ट्रेसुद्धा किती सुंदर आहे!" जाई म्हणाली.

"आमच्या काकूनं बंगलोरहून जरीची लहान साडी आणली आहे मला. काय बाई छान आहे म्हणून सांगूं!"

सुलीला आतां मैत्रिणींचें बोलणेंसुद्धा ऐकवेना. ती मुकाट्यानें उठून गेली तिथून. तिचे डोळे पाण्यानें भरले होते. तिला रस्त्यांत उड्या मारणारीं शेळीचीं पिलें, कँवकँव करणारें काळें कुत्रें, झाडावर उडणारे पक्षी कांहींही दिसत नव्हतें. कशीबशी जड पावलांनीं ती घरांत शिरली.

आई बागेंत तिचीच वाट पाहात उभी होती. ती एकदम म्हणाली, "सुले! किती उशीर केलास घरीं यायला! तुला एक मजा दाखवायची आहे ना!"

सुलीला इंदूच्या आत्यांचा पराक्रम सांगायचा होता. पण छे! तिला धीरच होईना!

"वरच्या माडींत जा बाळ."

माडींत शिरल्याबरोबर एक मोठी छानदार बाई एकदम हसून पुढें आली व म्हणाली, "सुलुताई तुम्हीच तर!" अन् तिनें तिला प्रेमानें जवळ घेतलें. मग केसांवर हात फिरवीत ती म्हणाली, "बाळ, कोण बरं मी? नाहीं ओळखत? हरलीस?"

"हरलें बाई!"

"अग! मी तुझी मामी! तुला मामी हवी ना! म्हणून....त्यांनीं....?"

"त्यांनीं कुणी....?"

इकडे तिकडे पाहात मामी हळूच म्हणाली, "तुझ्या बापूमामांनीं पत्र लिहिलं मला....! तुझ्यासाठीं मी आलें!"

"इतके दिवस कुठें होतीस?"

"शाळेंत शिकत होतें आईकडे. आतां परीक्षा



झाली, शिकणं संपलं बरं! आतां मी आमच्या

२१ सुलुताईजवळ राहाणार नेहमीं! बरं, सुले, मीं तुला काय आणलंय् ओळख बरं!"

"लहान बाहुलीऽ....?" लाजत लाजत सुलीनें प्रश्न केला.

पेटी उघडून मामींनीं एक मोठी बाहुली सुलीला दिली. तिचें कपडे रेशमी होते. तिला खऱ्या केसांप्रमाणेंच केसही होते व ती डोळे उघडून हसतही होती.

मामीकडे हसत पाहात सुलीनें बाहुलीचा पटकन् एक पापा घेतला. अन् फ्रॉक सावरीत ती मोठ्या ऐटींत खुर्चीवर बसली. मनांत मात्र ती विचार करीत होती उद्यां सकाळचा! उद्यां सकाळीं ती धावत जाऊन इंदू, तारा, आशा, जाई, मैना, साऱ्यांना गाल फुगवून दिमाखानें म्हणणार होती....

"ए! माझ्यासुद्धा मामीनं मला मुंबईहून केवढी मोठी सुंदर बाहुली आणली आहे ग! काय वाटलं तुम्हांला? ती हसते, डोळे मिटते, उघडते...! माझी बाहुली...! हो ऽ ऽ....! बाहुलीचं नांव शोभा आहे बरं माझ्या! असं काय बघतां ग माझ्याकडे? खरंच मला मामी आहे....हो...हो, कालच आली ती इंदुराहून. कित्ती छान आहे आमची शांतामामी! हो हो! आहेच मुळीं!!"

केवढा दिमाखाचा, बालआयुष्यांतला तो उद्यांचा दिवस! त्याची महती कुठवर वर्णन करावी आम्हीं?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
पु. क्र. ... नों. दि ...
पि. ... क्र. ...




डिक् हा एक अतिशयच गरीब मुलगा होता. लंडनजवळ लँकेशायर म्हणून एक प्रांत आहे तेथें तो रहात असे. पण आई मेली, बापही मरून गेला व बिचारा डिक् पोट भरण्यासाठीं लंडनला गेला. सर्व जगांत त्याला फक्त एकच मित्र होता. ओळखतो का तुम्हांला? नाहीं? तो मित्र म्हणजे एक सुंदरसें मांजर. रस्त्यांत एकदां थंडीनें, भुकेनें मरत होतें तें, तेव्हां डिक्नें त्याला उचलून घेतलें होतें व स्वतः अर्धपोटीं राहून त्याला वाढवलें होतें. त्याचें आपल्या मांजरावर विलक्षण प्रेम होतें!

डिक्‌ला वाटलें होतें, लंडन हें फार श्रीमंत शहर असेल, पण तेथेंही त्यानें दरिद्री लोक पाहिले. एवढेंच नव्हे तर ह्या श्रीमंत शहरांत त्याला कित्येक दिवस रस्त्यावर झोंपून नि अर्धपोटीं राहून काढावे लागले! शेवटीं त्याला एका श्रीमंताकडे वाढण्याची नोकरी मिळाली. पण सैंपाकीणबाई भारी दुष्ट होती. ती रोज चुका काढून त्याला मारीत असे! त्याला घरांत निजूंदेखील द्यायची नाहीं. माळ्यावर एका भिकारड्या जागेंत त्याची निजण्याची जागा होती. उंदरांचा, घुशींचा तेथें अगदीं सुळसुळाट होता. डिक्‌ला मांजराचा ह्या वेळीं फारच उपयोग झाला. त्यानें लवकरच ते सारे उंदीर नि घुशी नाहींशा करून टाकल्या; डिक्‌ला शांत झोप लागूं लागली.

डिक् ज्याच्याकडे राहिला होता, तो एक श्रीमंत व्यापारी होता. दूरदूरच्या देशांत इकडचा माल बोटीनें न्यायचा, विकायचा व तिकडचा माल इकडे आणायचा. ह्या व्यापारासाठीं त्याचीं पुष्कळ जहाजें पण होतीं. व्यापारी खरोखर चांगल्या स्वभावाचा माणूस होता. आपल्या नोकराचाकरांचादेखील माल तो आपल्या जहाजांतून नेई व विक्री करून मिळेल तो नफा त्यांना देत असे.

त्या दिवशीं ब्लॅकमूर लोकांच्या देशाला जहाज सुटणार होतें. व्यापाऱ्याची तरुण मुलगी ॲलिस सैंपाकघरांत येऊन डिक्‌ला म्हणाली, "हें बघ डिक्, आज पप्पांचं जहाज जाणार आहे व्यापारी माल घेऊन! तूं पाठव ना कांहीं तरी. खूप नफा होतो बघ, त्या देशांत!"

"पण माझ्याजवळ आहे काय? एवढं एक मांजर!" वाईट तोंड करून डिक्‌नें सांगितलें.

"ठीक! मांजर तर मांजर! तेंच पाठवून पाहा ना तूं एकदां!"

मालकाच्या मुलीच्या मर्जीखातर डिक्‌नें आपलें

आवडतें मांजर विक्रीकरितां पाठवलें. जगांतल्या त्या एकुलत्या एक मित्राला दूर करतांना डिक्चे मोठाले डोळे पाण्यानें भरून आले होते. लवकरच मांजराचा वियोग त्याला फार जाणवूं लागला. उंदीरघुशी त्याला रात्रभर भंडावून सोडूं लागल्या! रात्रीं झोप नाहीं; दिवसां स्वयंपाकीणकाकूंचीं कडूजहर बोलणीं नि छळ! त्याला तिथें राहावेंसेंच वाटेना. एक दिवस सकाळीं आपलें गांठोडें उचलून डिक्नें घर सोडलें.

सकाळची वेळ होती. चर्चमधल्या घंटा वाजत होत्या. दमून डिक् एका दगडावर बसला. तोंच घंटांच्या आवाजांतून त्यानें स्पष्ट नाद ऐकला.

भाग्याचे दैवाचे धागे
बांधुनि आणती तुजमागें
येशील बाळा परत तरी
होशिल इथला अधिकारी ॥

भिकारी मुलगा....लंडनचा अधिकारी! किती हास्यास्पद गोष्ट! कोण विश्वास ठेवणार?

डिक् खिन्नपणानें हसला अन् मग आपल्याला कोठेंच अधिकार नाहीं ह्या कल्पनेनें त्याच्या डोळ्यांतून आंसवें गळूं लागलीं. तो परत फिरला. मनांत तो म्हणाला, "काकू वाईट असेल. पण ॲलिस किती गोड बोलते! पाहूं या तिथेंच खटपट करून नशिबाची परीक्षा!" अन् डिक् त्या सैंपाकघरांतून पुन्हा वाढतांना दिसूं लागला.

इकडे ब्लॅकमूरच्या देशाला जहाज पोंचलें. जहाजाचा कॅप्टन राजाच्या बोलावण्यावरून जेवायला गेला. ब्लॅकमूरचा राजा व कॅप्टन जेवायच्या टेबला-जवळ बसले. बशांतून पदार्थ वाढले अन् काय नवलाची गोष्ट! उंदीर नि घुशींचा एक तांडाच्या तांडा टेबलावर चढून त्यांनीं तें सारें अन्न फस्त करून टाकलें!

राजा खेदानें म्हणाला, "झालं देवा, देवा! संपलं आमचं जेवण! अरे बापरे! किती हे उंदीर?"

"राजेसाहेब, तुम्ही मांजर कां बाळगत नाहीं एखादं? साऱ्या उंदीरघुशींचा तें फडशा पाडील दोन दिवसांत!" कॅप्टन उद्गारला.

"मांजर?" राजे आश्चर्यानें ओरडले, "म्हणजे काय? मांजर! तें सिंहासारखं असतं काय? मीं शंभर सिंह घेतले, पन्नास वाघ विकत घेतले, पण काय सांगायचं दुर्दैव! त्यांपैकीं एकालाही एक चिचुंद्रीदेखील मारतां येत नाहीं!"

कॅप्टन म्हणाला, "जरा थांबा. गंमत दाखवतों तुम्हांला." असें म्हणून त्यानें जहाजावरून मांजर आणवलें व टेबलावर सोडलें. डिकच्या मांजराला मेजवानीच झाली ती! उंदरामागून उंदीर असे पांचपन्नास उंदीर त्यानें झपाट्यानें मारून टाकले.


ब्लॅकमूरच्या राजाला अतिशय आनंद झाला. तो म्हणाला, "हा प्राणी मी विकत घेणार! माझ्या अर्ध्या राज्याएवढी किंमत असली तरीदेखील मी घेणारच! तुम्ही सहा पोतीं सोन्याला देतां हें दिव्य मांजर मला?"

"हो....हो!" कॅप्टन म्हणाला.

अन् अशा भयंकर किंमतीला तें मांजर विकलें गेलें! सहा पोतीं भरून सोनें लंडनला डिकच्या नांवावर येऊन पोंचलें.

काकू व्यापाऱ्याला म्हणाल्या, "अहो, तें एवढंसं कार्टं! त्याला काय कळतंय्? त्याला कशाला देतां इतकं मोठं सोनं? तुम्हीच ठेवून द्या!"

पण व्यापारी प्रामाणिक होता. त्यानें तें ऐकलें नाहीं व सहाच्या सहा पोतीं डिकच्या हवालीं केलीं!



स्वतःच्या मुलासारखा मानून डिक्‌ला व्यापाऱ्यानें वाढवलें व फार योग्यतेला चढवलें!

कालांतरानें डिक् फार हुशार निघाला व स्वतःच्या हुषारीवर लंडनचा तीन वेळां लॉर्ड मेयर झाला. अलिसलाच त्यानें पत्नी करून घेतलें!

डिक्‌च्या लहानपणच्या ह्या गोष्टीवर पुष्कळांचा विश्वास बसणार नाहीं. न कां बसेना! ही गोष्ट अतिशय गोड नि मनोरंजक आहे हें तर तुम्हांला मान्य आहे ना?

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
वि. भाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा.



# अद्भुत दगड

एक होता भटजी. त्याचा भिक्षुकीचा धंदा बिलकुल चालत नव्हता. एक दिवस उमाकाकू म्हणाल्या, " आतां घरांत तांदूळच नाहींत. जेवायला हवं असेल तर मिळवून आणा आधीं. आळशी न् सुस्तपणानं जेवण मिळत नसतं ! "

रागारागानें भटजी दूर दूर गेले....अगदीं रानांत ! रात्र झाली. भटजींना दूर दिवा दिसला, तिकडे ते गेले. पाहातात तर वनदेवतांची मेजवानी चालली आहे. भटजींनीं त्यांचे पाय धरले, तेव्हां त्यांना दया आली. भटजींना जेवण, कपडे, राहायला जागा मिळाली.

लौकरच भटजीबुवांनीं पाहिलें कीं, त्या वनदेवतांच्याजवळ एक अद्भुत दगड आहे. त्याच्याकडून काय पाहिजे तें मिळूं शकतें ! एक दिवस रात्रीं भटजींनीं हळूच दगड उचलला व पोबारा केला ! समोरून एक काठी टेकीत टेकीत म्हातारा येत होता. तो म्हणाला, " भटजीबुवा, भारी भूक लागली आहे हो ! देतां का दशमीबिशमी ? "

भटजी म्हणाले, " दशमीच कां ? जिलबीचं जेवण देतों. "

दगड हातांत घेऊन शामभट म्हणाले, " दोन पक्वान्नांचीं ताटं हवींत ! "

 झालें. दोन वाढलेलीं ताटें एकदम दिसूं लागलीं!

जेवण झाल्यावर म्हातारा म्हणाला, "तुमचा दगड मला देतां का? त्याबद्दल ही काठी घ्या, ही जादूची आहे. 'काठी चलाव' म्हटलं की ही मार द्यायला सुरुवात करील! 'काठी, पुरे' म्हटलं कीं थांबेल!"

"ठीक आहे. द्या काठी अन् हा घ्या दगड."

काठी घेऊन दहा पावलें गेल्यावर मागें वळून भटजी म्हणाले, "चलो काठी! काठीनें मारिन तुजला। दे दे माझा दगड मला!"

काठीनें बिचाऱ्या म्हाताऱ्याला तडाके द्यायला सुरुवात केली! म्हाताऱ्यानें दगड फेकून दिला व 'मेलों' करीत पळ काढला.

दगड व काठी घेऊन भटजी निघाले. समोरून एक भुकेला घोडेस्वार येत होता. त्यालाही भटजींनीं बासुंदीपुरीचें जेवण दिलें!

घोडेस्वार म्हणाला, "भटजीमहाराज, मला हा दगड देतां? त्याबद्दल ही तरवार घ्या. ही जादूची आहे. वाटेल तेवढं सैन्य असो; ही आपल्या आपण कापून काढते. अन् आपल्याजवळ परत येते. नुसती तरवार फेकली कीं सैन्यच्या सैन्य ठार!"

"ठीक आहे. घ्या दगड, नि द्या तरवार!"

दहा पावलें गेल्यावर भटजी म्हणतात,

"काठीनें मारिन तुजला। दे दे माझा दगड मला। चल जा येथुन निघोनिया। तलवारिस फेंकूं का तुझिया? काठी चलो!"

काठीनें घोडेस्वाराला असें झोडपून काढलें कीं, त्याला दगड टाकून पळतां पळतां भुई थोडी झाली!

घरीं गेल्यावर भटजींच्या त्या तीन वस्तु पाहून उमाकाकू फारच खूष झाल्या. त्यांनीं लवकरच मोठा वाडा बांधला, नोकरचाकर ठेवले. एक दिवस 



उमाकाकू म्हणाल्या, " राजेसाहेबांना जेवायला बोलावूं या !"

शामभट म्हणाला, "नको ! कशाला उगीच ?"

बरेंच भांडण होऊन अखेर राजेसाहेबांना मेजवानी झाली ! राजवाड्याहूनही थाटमाट होता. राजानें विचारलें, "असं कसं ? इतके कसे श्रीमंत झालांत ?"

शामभटानें डोळे वटारले, तिकडे न पाहातां उमाकाकू डौलानें म्हणाल्या, "इकडे एक दगड आहे. त्याजजवळून हवं तें मिळतं !"

"माझं अर्धं राज्य देतों. तो दगड मला द्या." राजा म्हणाला.

"देत नाहीं !" भटजी ओरडले.

राजा संतापून म्हणाला. "अरे भटुरड्या ! मला नाहीं म्हणतोस ? मी जीव घेईन तुझा !"

"घ्या" भटजी म्हणाले व 'काठी चलो' म्हणून ओरडले.

काठीच्या मारानें राजा रडत ओरडत पळत राजवाड्यांत गेला. त्यानें दोन हजार सैन्य पाठविलें व भटजींना ठार मारण्याचा हुकूम दिला ! सैन्य पाहातांच भटजींनीं तरवार फेकली. तिनें कापाकापीचा सपाटा चालविला. हें पाहून सेनापतींनीं भटजींचे पाय धरले, क्षमा मागितली व सर्व शिपाई चालते झाले.

पुन्हा राजानें त्यांचें कधीं नांवदेखील काढलें नाहीं !

# पत्त्यांचा कागदी बंगला

तुम्ही नेहमीं बांधतां. वाऱ्यामुळें तो कोसळला तरी परत परत बांधण्यांत फार मजा वाटते. पण हातरुमालांचा कापडी वाडा निळा पोषाख केलेल्या अगदीं छोट्या निळूनें बांधला. तुमचे हातरुमाल हरवले म्हणजे ते निळू आपल्या चिमट्यानें उचलतो व त्यांचा डोंगर रचतो. पुष्पाचे हातरुमाल निळूनेंच घेतले होते.

पण कागदी बंगला काय, किंवा कापडी वाडा काय, ते बांधण्यांत थोडा वेळ गंमत वाटते. सुटींतला बाकीचा वेळ कसा घालवायचा ? आम्ही सांगतों. मुलांसाठीं सुंदर सुंदर चित्रांनीं सजवलेल्या छान छान गोष्टींच्या पुस्तकांचा एक डोंगर आम्हीं रचला आहे. त्या डोंगरावर सहल करण्यांत तुमचा वेळ चांगला जाईल.

ह्या गोष्टींच्या पुस्तकांच्या डोंगरांत निरनिराळ्या प्रकारचे, रंगीबेरंगी, देशी-विलायती कागदी दगड आहेत. त्यांपैकीं कांहीं हे पाहा —

| | |
|---|---|
| गमतीच्या गोष्टी, १-४ नेरूरकर-प्र. | ६ आणे |
| मौजेच्या गोष्टी, १-३, | ४,४,५ आणे |
| सुरस गोष्टी, १-२, मनोहर, | ६-४॥ आणे |
| नऊ गोष्टी, ग. म. वैद्य, | ४ आणे |
| बारा गोष्टी, दा. वि. फफे, | ४ आणे |
| पस्तीस गोष्टी, | ८ आणे |
| नदीकांठच्या गोष्टी, पाळवणकर | ४ आणे |
| टेकडीवरच्या गोष्टी, ,, | ४ आणे |
| गच्चीवरच्या गोष्टी, ,, | ४ आणे |
| आपल्या गोष्टी, | ४ आणे |
| आईच्या गोष्टी, भा. म. वैद्य, | ४ आणे |
| आजीबाईच्या गोष्टी, १-२, मोडक, प्र. | ८ आणे |
| इटुकल्य... | |
| ऐतिहासि... | |
| कथामोहिनी, १-२, दा. पां. रानडे, प्र. | ६ आणे |
| कथाकुंज, बा. रा. प्रभु, | ६ आणे |
| डोक्याच्या आणि विन-डोक्याच्या गोष्टी, अभ्यंकर, | ८ आणे |
| नदीची गोष्ट, ताराबाई मोडक, | ८ आणे |
| नवीन गोष्टी, त्रि. म. धुळे, | ६ आणे |
| नीतिकथा, भाग १, ग. म. वैद्य, | ६ आणे |
| बालनीतिकथा, ग. म. वैद्य, | ६ आणे |

आणखीही अशीं शेंकडो आहेत. आमच्या डोंगरांत वापरलेल्या 'दगडांची' यादी मागवा आणि मग उचला त्यांतले आवडतील ते. घाबरूं नका. हे 'दगड' अगदीं हलके आहेत.

IRBK-0106267
IRBK-0106267
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई